# मानेतील कंठस्थ-ग्रंथी

मानेतील कंठस्थ म्हणजे थायरॉईड ग्रंथी ही एक लहानशी ग्रंथी असते. ती मानेच्या पुढील भागात स्वरयंत्राच्या (लॅरिंक्स) खाली असते. या ग्रंथीला अवटुग्रंथी असेही म्हणतात.




**कंठस्थ ग्रंथी**

शरीराचे कार्य नियमितपणे चालू राहण्यासाठी शरीराला थायरोक्सिन (टी३) आणि ट्रायआयोडोथायरोनिन (टी४) या दोन प्रमुख संप्रेरकांची गरज असते. या संप्रेरकांच्या निर्मितीचे काम ही ग्रंथी करत असल्यामुळे तिला 'कार्यकारक' (एन्डोक्राई) ग्रंथी असेही म्हणतात. थायरोक्सिनच्या निर्मितीसाठी या ग्रंथीला आयोडिनचा नियमित पुरवठा होणे आवश्यक असते. हे आयोडिन मासे आणि दूध यांतून मिळते; तसेच ते खाण्याच्या मिठात घालून देखील मिळवता येते.

रक्तातील टी३ आणि टी४ ची पातळी खाली आली तर मेंदूमधील अधश्चेतक (हायपोथॅलॅमस) रक्तामध्ये टीआरएच-कंठस्थ ग्रंथि मोचनकारी संप्रेरक-थायरॉईड रिलीजिंग हॉर्मोन सोडतो. रक्तामधील टीआरएचची पातळी वाढल्याबरोबर पीयूष ग्रंथी (पिच्युटरी) टीएसएच-कंठस्थ ग्रंथि उद्दीपक संप्रेरक-थायरॉईड स्टिम्युलेटिंग हॉर्मोन सोडते व त्यामुळे कंठस्थ ग्रंथी अधिक प्रमाणात कंठस्थ ग्रंथि संप्रेरके निर्माण करतात.

जेव्हा कंठस्थग्रंथी पुरेशा प्रमाणात संप्रेरके निर्माण करत नाहीत तेव्हा त्या स्थितीला कंठस्थग्रंथि अल्पक्रियता (हायपोथायरॉईडीझम) असे म्हणतात. यामुळे थकवा वाटतो, सुस्ती येते आणि सहजगत्या वजन वाढते. कंठस्थग्रंथी जेव्हा अतिप्रमाणात संप्रेरकांची निर्मिती करतात तेव्हा त्या स्थितीला कंठस्थग्रंथी अतिक्रियता (हायपर थायरॉईडीझम) असे म्हणतात. यामुळे कंठस्थग्रंथि अल्पक्रियतेच्या बरोबर उलटी लक्षणे निर्माण होतात. वजन कमी होते, भूक वाढते आणि आराम मिळत नाही.

### फुटक (फॉलिक्युलर) कंठस्थ ग्रंथि कर्करोग

हा कमी प्रमाणात आढळून येणारा कर्करोग असून तो बहुधा वृद्ध व्यक्तींमध्ये आढळून येतो.

### मध्यांग (मेड्युलरी) कंठस्थ ग्रंथि कर्करोग

कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगाचा हा अत्यंत विरळा प्रकार असून तो आनुवंशिक असतो असे म्हणतात. याच कारणास्तव रुग्णाच्या कुटुंबाच्या प्रत्येक व्यक्तीची या रोगाची लक्षणे आहेत का हे पाहण्यासाठी नियमित कालांतराने तपासणी केली जाते.

### ॲनाप्लॅस्टिक कंठस्थ ग्रंथि कर्करोग

हा कर्करोग बहुतेक वृद्ध व्यक्तींमध्ये आणि विशेषकरून वृद्ध स्त्रियांमध्ये आढळून येतो. अन्य प्रकारच्या कंठस्थ–ग्रंथि–कर्करोगाच्या तुलनेत हा कर्करोग झपाट्याने वाढतो.

## कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगाने पीडित होण्याचा धोका व कारणे

अधिकांश व्यक्तींना कंठस्थ ग्रंथींचा कर्करोग कशामुळे उद्‌भवला ह्याचे अचूक कारण अद्याप कळू शकलेले नाही, परंतु हे जाणून घेण्याकरिता सदैव संशोधन चालू आहे. तुम्हाला हा कर्करोग होऊ शकतो. ह्याकरिता खालील धोके असू शकतात:–

- सौम्य प्रकारचा कंठस्थ ग्रंथीचा रोग (थायरॉईड डिसीज)
- आहार
- शरीरात आयोडीनची मात्रा कमी झाली असल्यास
- कौंटुबिक दोषी जिनुक (जीन्स)
- शरीरावर किरणोत्सर्गाचा (रेडिएशन) प्रभाव झाला असल्यास

### सौम्य प्रकारचा कंठस्थ ग्रंथीचा रोग (थायरॉईड डिसीज)

अशा व्यक्ति ज्यांना काही प्रकारच्या कर्करोग नसलेल्या (सौम्य) प्रकारच्या कंठस्थ ग्रंथीची पीडा झाली असल्यास, त्यांना थायरॉईड कॅन्सरची पीडा होण्याचा अधिक धोका असतो. जसे:–

- थायरॉईड ग्रंथीचा आकार मोठा झाला असल्यास (गॉइटर)
- थायरॉईड नोड्यूल्स (ॲडिनोमाज–थायरॉईड ग्रंथींच्या आवरणातील पेशीत बिघाड झाला असल्यास)
- थायरॉईड ग्रंथीत जळजळ होत असल्यास (थायरॉईडीटीस)

सामान्यतः अति सक्रीय (ओवरॲक्टीव) किंवा निष्क्रिय (अंडर ॲक्टीव) थायरॉईड ग्रंथीमुळे ह्या प्रकारचा कर्करोग होण्याच्या धोक्यात वाढ होत नसते.

## आहार

निष्कृष्ठ प्रकारच्या आहारात लोणी, चीज तसेच मांस यांचे प्रमाण खूप अधिक असल्यास थायरॉईड कर्करोग होण्याचा धोका अधिक असतो.

## शरीरातील आयोडीनची मात्रा कमी झाली असल्यास

अशा व्यक्ति ज्यांच्या रोजच्या आहारात आयोडीनचे प्रमाण खूप कमी असते अशा व्यक्तींना थायरॉईड कर्करोगाची पीडा होण्याचा धोका अधिक असतो. जर तुमच्या शरीरातील आयोडीनचे प्रमाण कमी झाले असताना तुमच्यावर किरणोत्सर्गी वातावरणांचा प्रभाव झाल्यास किंवा तुम्हाला सौम्य प्रकारच्या थायरॉईड रोगाची अडचण असल्यास या कर्करोगाचा धोका अधिक असतो.

आयोडीन द्रव्य मातीतून उपलब्ध होते, जर तुम्ही ज्या प्रदेशात राहता तेथील मातीत आयोडीन प्रमाण खूप कमी असल्यास तेथे पिकणाऱ्या भाज्यांत तसेच त्या भागातील पशुंच्या दूधात व पिण्याच्या पाण्यात आयोडीन प्रमाण कमी असते.

## कौंटुबिक दोषी जिनुक (जीन्स)

अल्प संख्येत काही व्यक्तींच्या शरीरात कौंटुबिक कारणामुळे जन्मतःच दोषी जिनुक (जीन्स) पाहण्यात येतात. ह्या दोषी जिनुकना आरईटी (RET) जिनुक म्हटले जाते. अशा जन्मतःच दिसून येण्याचे कर्करोगाचे दोन प्रमुख प्रकार आहेत.

- कौंटुबिक (फॅमिलीयल) मेड्यूलर थायरॉईड कॅन्सर (FMTC) ज्यामुळे कुटुंबातील कित्येक व्यक्तींना हा उपद्रव होतो.
- मल्टीयल एन्डोक्राइन निओप्लासिया (एम् ई एन्–MEN) सिन्ड्रम प्रकार २ए आणि २बी. ह्या सिन्ड्रम/ संरक्षणामुळे कुटुंबातील बऱ्याच व्यक्तींना विभिन्न प्रकारच्या एन्डोक्राइन गाठींचा (ट्यूमर्स) त्रास होऊ शकतो, ज्यात मेड्यूलरी थायरॉईड कर्करोगाचा पण समावेश होतो. आमच्याकडे MEN-2 सिन्ड्रम वर अधिक माहिती उपलब्ध आहे.

कुटुंबातील अशी कोणा व्यक्तीला मेड्यूलरी थायरॉईड कॅन्सर पीडा असल्यास त्या व्यक्तीच्या शरीरात RET जिनुक आहेत का? ह्याची तपासणी होऊ शकते. ही दूषित जिनुक असल्यास त्या व्यक्तीला शरीरातून थायरॉईड ग्रंथी काढून टाकण्याचा सल्ला दिला जाईल, ज्यामुळे थायरॉईडच्या कर्करोगापासून त्याचा बचाव होईल. ह्यास प्रॉफिलॅक्टीक थायरॉईडोक्टमी म्हटले जाते.

थायरॉईड कर्करोग उद्‌भवण्याचा अजून एक धोका असतो जर जन्मतःच कौटुंबिक अवस्थेमुळे आंतड्यात फॅमिलीयल ॲडिनोमॅटस् पॉलिपोसिस् (एफ् ए पी–FAP) चा उपसर्ग असल्यास.

## कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगाची लक्षणे

बहुतांश रुग्णांमध्ये या कर्करोगाची वाढ मंदगतीने होते. मानेमध्ये झालेली वेदनारहित व हळूहळू वाढणारी गाठ हे या कर्करोगाचे पहिले लक्षण होय. कधीकधी या गाठीमुळे अन्ननलिकेवर किंवा श्वासनलिकेवर दाब पडतो आणि गिळण्याला व श्वसनाला त्रास होतो.

क्वचित कधीकधी कर्करोग कंठग्रंथीच्या बाहेर पसरतो आणि हाडांमध्ये किंवा फुफ्फुसांमध्ये पसरलेल्या या कर्करोगाची गाठ हेच पहिले लक्षण ठरते. पण असे फारच क्वचित घडते.

कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगामुळे कंठस्थ ग्रंथि – संप्रेरकांच्या निर्मितीवर बाधक परिणाम होत नाही. त्यामुळे कंठस्थ ग्रंथि अल्पक्रियता किंवा अतिक्रियता ही लक्षणे क्वचित निर्माण होतात.

मानेमध्ये कोणतीही गाठ आढळून आल्यास किंवा वरीलपैकी कोणतीही लक्षणे आढळून आल्यास ताबडतोब डॉक्टरांना भेटावे. ही लक्षणे कर्करोगाचीच असतील असे नव्हे; कर्करोगाशिवाय अन्य रोगांमध्येही ही लक्षणे आढळून येतात. त्यामुळे जरी वरील लक्षणे आढळून आली तरी त्या सर्व लोकांना कर्करोगच झालेला असेल असे नव्हे.

## डॉक्टर रोगनिदान कसे करतात

सुरुवातीला रुग्ण स्वतःच्या कुटुंबाच्या डॉक्टराकडे जातो. ते संशय आल्या रुग्णाची तपासणी करतात किंवा आवश्यकतेनुसार त्याला एक्स–रे काढण्यास सांगतात किंवा रुग्णालयात अधिक चाचणीसाठी पाठविण्याची व्यवस्था करतात किंवा तज्ज्ञाला भेटण्याची सोय करतात.

रुग्णालयात दाखल झाल्यावर तेथील तज्ज्ञ डॉक्टर रुग्णाच्या आजाराची इत्यंभूत माहिती गोळा केल्यानंतरच त्याची शारीरिक तपासणी करतात. तपासणी करताना डॉक्टरांना रुग्णाच्या मानेमध्ये घट्ट गाठ/सूज जाणवण्याची शक्यता असते.

## आणखी काही चाचण्या

मानेच्या सुजेवरून कर्करोगाचा संशय आल्यास रोगनिदान निश्चित करण्यासाठी डॉक्टर पुढीलप्रमाणे आणखी काही चाचण्या करावयास सांगतात.

### टोकदार सुईद्वारे चूषण करून पेशीपरीक्षा किंवा ऊतिपरीक्षा

चूषण करून पेशीपरीक्षा करताना एक छोटीशी टोकदार सुई हळुवारपणे मानेत गाठ आलेल्या भागात सरकवली जाते. सुईद्वारे पेशी काढून सुक्ष्मदर्शक यंत्राखाली त्या पेशींची

तपासणी केली जाते. कर्करोगी पेशी आहेत की नाहीत हे पाहण्यासाठी ही तपासणी केली जाते.

क्वचित कधीतरी त्या सूज आलेल्या भागातून ऊतींचा नमुना काढून घेतला जातो. या ऊतिपरीक्षेसाठी स्थानिक बधिरीकरण करून सूज आलेल्या भागात सुई सरकवली जाते आणि कंठस्थग्रंथीमधील ऊतीचा नमुना काढून घेतला जातो. या नमुन्याची सूक्ष्मदर्शक यंत्राखाली तपासणी करून कर्करोग पेशी आहेत का हे पाहिले जाते. ही चाचणी बाह्यरुग्ण विभागात होते.

## रक्ताची चाचणी

कंठस्थ–ग्रंथि–संप्रेरकाची पातळी प्रसामान्य आहे की नाही हे पाहण्यासाठी रक्ताचा नमुना घेऊन त्याची तपासणी केली जाते. तसेच रुग्णाचे सर्वसाधारण आरोग्य कसे आहे हे तपासण्यासाठी देखील संपूर्ण उपचार कालावधीदरम्यान सातत्याने रक्ततपासणी केली जाते.

## समस्थानिक कंठस्थ ग्रंथिचित्रण (रेडियोआयसोटोप स्कॅन)

या चाचणीसाठी टेक्नेशियम नावाचा किरणोत्सारी पदार्थ किंवा आयोडिन अगदी सूक्ष्म प्रमाणात हाताच्या शिरेत टोचले जाते. २० मिनिटांनंतर रुग्णाला पलगावर झोपायला सांगितले जाते आणि त्याच्या मानेवर गामा कॅमेरा नावाचे यंत्र केंद्रित करण्यात येते. कंठस्थ ग्रंथीमध्ये किरणोत्सारी पदार्थाचा होणारा परिणाम या यंत्राद्वारे निदर्शनास येतो.

कंठस्थ ग्रंथीमधील प्रसामान्य पेशी ज्याप्रमाणे किरणोत्सारी पदार्थ शोषून घेतात त्याप्रमाणे कर्करोगपेशी शोषून घेत नाहीत. त्यामुळे कॅमेऱ्याला कर्करोगपेशी असलेले भाग टिपता येतात. या भागांना 'शीत भाग' किंवा 'शीत गाठी' असे म्हणतात.

## कंठस्थ ग्रंथीचे श्राव्यातीत ध्वनिलहरी प्रतिमांकन (अल्ट्रासाउन्ड स्कॅन)

मानेच्या आणि कंठस्थ ग्रंथीच्या आतील भागाची चित्रे घेण्यासाठी या चाचणीचा वापर करण्यात येतो. या चाचणीमध्ये श्राव्यातील ध्वनिलहरीचा वापर करून चित्रे घेतली जातात.

रुग्ण पलंगावर पाठीवर आरामशीर निजल्यावर त्याच्या मानेवर एक जेल लावतात. श्राव्यातीत ध्वनिलहरी निर्माण करणारी मायक्रोफोनसारखी दिसणारी एक लहानशी सळई मानेवर फिरवली जाते. संगणकयंत्राच्या सहाय्याने प्रतिध्वनींचे चित्रात रूपांतर केले जाते. त्यावरून घट्ट गाठ आहे का गळूमध्ये केवळ द्रवपदार्थ आहे ते निदर्शनास येते.

उपरोक्त दोन्ही छाननी–चित्रणे रुग्णालयाच्या स्कॅनिंग विभागात करण्यात येतात.

कधीकधी शस्त्रक्रियेने बायोप्सी करण्याची आवश्यकता असो ज्या वेळेस सामान्य स्थानिक अथवा पूर्ण दैहीक बेशुद्धी केल्यानंतर शल्यक कंठस्थ ग्रंथीच्या जवळ छोटासा छेद करून ग्रंथीचा लहानसा तुकडा नमूना म्हणून काढतो. ही क्रिया करतात जेव्हा सुईद्वारे परीक्षण करता येत नाही अथवा सुईतून योग्य प्रमाणात पेशीचा नमूना घेता येत नाही. जेव्हा प्रयोगशाळेत अचूक परीक्षण करता येत नाही.

## संगणकीय कापक्रम छायांकन (सीटी–CT/कॅट–CAT स्कॅन)

ह्या CT (कॅम्प्यूटराइज्ड टमोग्रफी) स्कॅन परीक्षणात क्रमाने शरीराच्या आतल्या भागाचे क्रमाने वेगवेगळ्या कोनातून बरीच छायाचित्रे घेतली जातात. ज्यांच्या सहाय्याने एक त्रिकोणमिती चित्र संगणक तयार करतो, ज्याच्यामुळे डॉक्टर कंठस्थ ग्रंथीत कर्कगाठ अचूक कोठे आहे याचे निदान करू शकतात. छायांकनात काहीही वेदना होत नाहीत, वेळ अदमासे १० ते ३० मिनिटे लागतात.

CT स्कॅन घेतेवेळी तुमच्या शरीरावर योग्य वेळाकरिता किरणांचा मारा होतो, परंतु यामुळे तुम्हास किंवा स्कॅननंतर तुमच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना काहीही धोका नसतो.

महत्वपूर्ण आहे की छायांकनात तुम्हास कोणतेही रंगाचे इन्जेक्शन दिले जात नाही, जे दूषित भाग चित्रणात उठून येण्याकरिता काही छायांकनात दिले जाते. ह्या रंग द्रवात आयोडीनचे अंश असतात ज्यांत रेडियोॲक्टीव आयोडीन कार्यरत असते.

## चुंबकीय अनुगुंजन प्रतिमांकन (एम् आर आय–MRI–मॅग्नेटिक रेझोनन्स ईमेजिंग)

ह्या MRI स्कॅन परीक्षणात क्ष–किरणांचे ठिकाणी चुंबकीय क्षेत्राच्या उपयोगाने कापक्रम छायांचित्र घेतले जाते. ह्या छायांकनामुळे कळू शकते की कर्करोग मानेत पसरला आहे कां?

छायांचित्र काढताना तुम्हाला बिना हालचाल अवस्थेत एका कोचवर पडून रहावे लागते, सगळा कोच हळूहळू एक छातूच्या डब्यात सरकत जातो. छायांकनात काहीही वेदना होत नाहीत. छायांकनास जवळजवळ १ तास वेळ लागतो. मशीन खूप गोंगाट करते म्हणून तुमच्या कानांवर हेडफोन्स बसवले जातील किंवा कानांत बोळे बसविले जातील.

धातूचा डब्बा एक शक्तिशाली लोहचुंबक असते म्हणून मशीनचे खोलीत प्रवेश करण्यापूर्वी शरीरावरील धातूंच्या सर्व वस्तू बाहेर काढून ठेवाव्या लागतील. जर तुम्ही धातुंच्या कारखान्यात काम करत असल्यास अथवा शरीरांत पेसमेकर अथवा कार्डिॲक मॉनिटर, अथवा सर्जिकल क्लिपा असल्यास डॉक्टरांना सूचित करावे. शरीरात धातूच्या वस्तू असल्यास तुम्हावर हे छायांकन होऊ शकत नाही.

धातूच्या बंद डब्यात गेल्यावर काही व्यक्तिंना गुदमरल्यासारखे होते, तुम्हास बंद वातावरणाचा त्रास होत असल्यास डॉक्टरांना कळवावे ते छायांचित्र घेताना तुम्हास उपाय सुचवतील.

### धनाणुं उत्सर्जन छायांकन (पॉझिट्रॉन एमिशन टमोग्रफी, पीईटी–PET स्कॅन)

हे एक आधुनिक विशेष प्रकारचे छायांकन आहे, ज्या छायाकनाकरिता तुम्हास कदाचित दूरच्या दुसऱ्या इस्पितळात जावे लागू शकते. ह्या छायांकनाची नेहमीच गरज नसते. तुमचे डॉक्टर तुम्हास योग्य सल्ला देतील. ह्या छायांकनाचा उपयोग जेव्हा कॅन्सर बरा झाल्यावर उलटून परत येतो तेव्हा परीक्षणाचे वेळेस करतात.

ह्या पेट स्कॅनात अल्प प्रमाणात किरणोत्सर्गी ग्लुकोजचा (एक प्रकारची साखर) उपयोग इन्जेक्शन द्वारे केला जावून अदमासे २ तासानंतर, शरीरातील विभिन्न भागांत पेशीच्या वाजवीपेक्षा जास्त सक्रीयतेचा छडा लावला जातो.

## कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगाचे स्तर (स्टेज)

कर्करोगाचा स्तर ही संज्ञा गाठीचा आकार व रोगाची प्राथमिक जागेपासून शरीराच्या इतर अवयवांत पसरण दर्शवते. कर्करोगाचा प्रकार व त्याची पसरण ह्याची माहिती मिळाल्यावर डॉक्टर त्यावरील योग्य उपचार ठरवू शकतात.

सामान्यतः कर्करोगाचे चार स्तर ठरवले जातात. लहान आकार व केवळ एकच ठिकाणावर (स्तर एक), पसरण निकटच्या भागात झाली असल्यास (स्तर दोन किंवा तीन), अथवा रोगाची पसरण शरीराच्या अन्य अवयवांत झाली असल्यास (स्तर चार). जर रोगाची पसरण प्राथमिक जागेपासून शरीराच्या कोणत्या दूरच्या अवयवांत झाली असल्यास त्याला **सेकंडरी** किंवा **घातक (मेटॅस्टेटिक)** कर्करोग हे नामाभिधान दिले जाते. कंठस्थ ग्रंथींचा कर्करोगाचा स्तर त्याचे विभिन्न प्रकार व त्याने पीडित व्यक्तिचे वय यावर पण अवलंबून असते. भिन्न प्रकारच्या स्तरीकरण पद्धतींचे विवरण खाली दिले आहे.

- पॅपीलरी व फॉलीक्यूलर थायरॉईड कर्करोग पीडिताचे वयोमान ४५च्या खाली
- पॅपीलरी किंवा फॉलीक्यूलर थायरॉईड कर्करोग पीडिताचे वयोमान ४५ पेक्षा अधिक आणि मेड्यूलरी कर्करोग
- ॲनाप्लास्टिक थायरॉईड कर्करोग
- ही एम् एम् (TMM) स्तर पद्धत

### पॅपीलरी व फॉलीक्यूलर थायरॉईडचा कर्करोग पीडिताचे वय ४५ पेक्षा कमी

**स्तर (स्टेज) १ –** कर्क गाठीचा आकार कसाही असेल आणि रोगाची पसरण जवळच्या लसिका ग्रंथीत झाली असेल परंतु प्रसरण शरीराच्या इतर अवयवांत झालेले नाही.

**स्तर (स्टेज) २ –** कर्क गाठीचा आकार कसाही असेल रोगाची प्रसरण इतर अवयवांत पण झाली आहे जसे हाडांत किंवा फुफुसांत.

या रोग्यांकरिता स्तर ३ किंवा ४ नसतो.

## पॅपीलरी किंवा फॉलीक्यूलर थायरॉईडचा कर्करोग पीडिताचे वय ४५ हून अधिक आणि मेड्यूलर कर्करोग

**स्तर (स्टेज) १ –** कर्क गाठीचा आकार २ सें.मी. पेक्षा अधिक नाही व गांठ केवळ कंठस्थ ग्रंथीतच आहे. रोगाची प्रसरण निकटच्या लसिका ग्रंथीत किंवा इतर अवयवांत नाही.

**स्तर (स्टेज) २ –** कर्कगाठ कंठस्थ ग्रंथीतच आहे व तिचा आकार २ ते ४ सेंमी. एवढा आहे. रोगाची प्रसरण निकटच्या लसिका (लिम्फ) ग्रंथीत किंवा इतर अवयवांत नाही.

**स्टेज (स्टेज) ३ –** कर्क गाठीचा आकार ४ सेंमी हून मोठा आहे व गाठ गंठस्थ ग्रंथीतच आहे अथवा ग्रंथीच्या जवळील लसिका नोड्‌समध्ये थोडी पसरलेली आहे.

**स्तर (स्टेज) ४ए –** कर्क गाठीचा आकार केवढाही असेल, रोगाची प्रसरण जवळच्या मानेच्या इतर अवयवांत (जसे स्नायू, नर्वज किंवा रक्तवाहिन्या) आणि/अथवा मानेच्या लसिका नोड्‌समध्ये किंवा छातीच्या वरील भागात आहे.

**स्तर (स्टेज) ४बी –** कर्क गाठीचा आकार केवढाही असू दे आणि रोगाची प्रसरण मानेच्या पेशीस्तरांत (टीश्यूज), मानेजवळील पाठीच्या हाडांत किंवा मानेच्या वरील परिसरांत किंवा छातीत झाली आहे.

**स्तर (स्टेज) ४सी –** कर्करोगाची प्रसरण शरीराच्या अन्य अवयवांत झाली आहे जसे हाडांत किंवा फुफ्फुसात.

## ॲनाप्लास्टिक थायरॉईड कर्करोग

ॲनाप्लास्टिक थायरॉईड कर्करोगाने पीडित प्रत्येक रुग्णाच्या रोगाचे स्तर ४ आहे असे मानले जाते. ह्या स्तराच्या आणखी तीन उपस्तर आहेत, निर्भर असते रोगाची प्रसरण किती आहे यावर.

**स्तर (स्टेज) ४ए –** कर्क गाठीचा आकार केवढाही असू दे पण गांठ कंठस्थ ग्रंथीतच आहे किंवा रोगाचा प्रभाव थोडासा जवळच्या लसिका नोड्‌सवर पण आहे परंतु रोग शरीरात कोठेही पसरलेला नाही.

**स्तर (स्टेज) ४बी –** कर्क गाठीचा आकार केवढाही असू दे पण रोगाची प्रसरण मानेच्या कोमल पेशीस्तरांत (सॉफ्ट टिश्यूज) सुरू झाली आहे. लसिका नोड्‌स पण रोगाने प्रभावित झाल्या आहेत परंतु रोग शरीराच्या अन्य अवयवांत पसरलेला नाही.

अभिप्राय घेण्यामुळे तुमचे उपचार सुरू होण्यात थोडा उशीर होईल, पण यामुळे तुम्हास व तुमच्या डॉक्टरांचा विश्वास जरूर वाढेल व त्यामुळे तुम्हाला फायदाच होईल.

जर तुम्ही असा दुसऱ्या डॉक्टरांचा अभिप्राय घेणार असाल तर त्या भेटीच्या वेळेत सोबत कोणी मित्र असू द्या, तसेच त्यांना विचारावयाच्या प्रश्नांची लिखित यादी पण जवळ असू द्या. ज्यामुळे चर्चेत होणाऱ्या तर्कवितर्कांची नोंद तुमच्या जवळ राहील ज्याचा पुढील काळात तुम्हाला फायदा होईल.

## शस्त्रक्रिया

कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगावरील पहिला उपचार म्हणजे शस्त्रक्रिया होय. कर्करोगाचे लवकर निदान होऊन लगेच शस्त्रक्रियेने ती गाठ काढून टाकली तर बहुतेक रुग्ण पूर्णतः बरे होतात.

काही रुग्णांच्या बाबतीत डॉक्टर कंठस्थ ग्रंथीचा फक्त रोगग्रस्त भागच काढून टाकतात. याला आंशिक कंठस्थग्रंथिउच्छेदन असे म्हणतात. तथापि बहुतेक वेळा डॉक्टर संपूर्ण कंठस्थ ग्रंथी काढून टाकतात. याला संपूर्ण कंठस्थग्रंथिउच्छेदन असे म्हणतात. संपूर्ण कंठस्थग्रंथी काढून टाकल्यामुळे बहुतांश कर्करोगग्रस्त भाग काढला जातो; तसेच उर्वरित भागामध्ये कर्करोगपेशी शिल्लक आहेत का हे देखील काळजीपूर्वक तपासता येते. बहुतेक वेळा या एकाच शस्त्रक्रियेमध्ये डॉक्टरांना सर्व कर्करोगपेशी काढून टाकता येतात.

कंठस्थ ग्रंथी ज्या भागात असतात जिथे कंठाकडे जाणाऱ्या चेता असतात. कधीकधी शस्त्रक्रियेमध्ये कंठाकडे जाणाऱ्या या चेतांना धक्का पोहोचण्याचा संभव असतो. त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर काही काळ रुग्णाचा आवाज क्षीण होतो. या संपूर्ण कंठस्थग्रंथिउच्छेदनामध्ये कंठस्थ ग्रंथींच्या मागे असलेल्या छोट्या छोट्या पराकंठस्थग्रंथींना देखील नुकसान पोहोचते. रक्तातील कॅल्शियमची पातळी नियंत्रित ठेवण्याचे काम या पराकंठस्थ ग्रंथी करत असतात आणि त्यांचे नुकसान झाल्यास रक्तातील कॅल्शियमची पातळी कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे आवश्यकता भासल्यास डॉक्टर कॅल्शियमवर्धक औषधे रुग्णाला घ्यावयास सांगतात.

कर्करोग आसपासच्या भागात पसरला आहे का हे पाहण्यासाठी कधीकधी डॉक्टर लसीकाग्रंथी काढून त्यांची तपासणी करतात.

कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगाला कधीकधी फक्त शस्त्रक्रियेचीच आवश्यकता असते. परंतु तरीही डॉक्टर कर्करोगाच्या पेशी संपूर्णतः नष्ट व्हाव्यात म्हणून किंवा शरीराच्या अन्य भागात जर कर्करोग पसरला असेल तर त्यावर उपचार म्हणून रुग्णावर किरणोत्सारी आयोडिनचा अंतर्गत किरणोपचार किंवा बाह्य किरणोपचार करतात.

## शस्त्रक्रियेनंतर

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला लवकरात लवकर हालचाल करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. बरे होण्यासाठी हे अत्यावश्यक असते. रुग्णाला जरी अंथरुणात पडून राहणे आवश्यक असले तरी त्याने पायाची हालचाल व खोल श्वसनाचा व्यायाम या गोष्टी नियमितपणे कराव्यात.

रुग्ण शस्त्रक्रियेनंतर बहुधा २४ तासांच्या आत खाऊपिऊ शकतो. परंतु तोपर्यंत त्याच्या शरीरातील कमी झालेल्या द्रावांची भरपाई करण्यासाठी शिरांतर्गत सुई टोचून सलाईन दिले जाते. जखमेच्या जागी एक किंवा अनेक निचरा नलिका लावल्या जातात. साधारणपणे ४८ तासानंतर त्या काढल्या जातात. जखम बंद करण्यासाठी टाके न घालता बहुतेकदा चाप लावले जातात आणि रुग्ण घरी जाण्यापूर्वी ते चाप काढून टाकण्यात येतात.

रुग्णाचा श्वसनमार्ग मोकळा राहावा म्हणून रुग्णाला पूर्णतः आडवे न झोपवता पंचेचाळीस अंशाच्या कोनात झोपवतात. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला थोड्याशा वेदना होतात व अस्वस्थपणा जाणवतो. त्यासाठी डॉक्टर वेदनाशामक औषधे लिहून देतात. त्या औषधांचा परिणाम होत नसल्यास रुग्णाने ताबडतोब डॉक्टरांना सांगावे म्हणजे रुग्णाला योग्य ठरतील अशी अन्य औषधे डॉक्टर त्याला देऊ शकतात.

बहुतेक रुग्ण शस्त्रक्रियेनंतर ४–५ दिवसांनी घरी जाऊ शकतात. काही काळ रुग्णाला गिळायला त्रास होतो. म्हणून मऊ आहार रुग्णाने घ्यावा. घरी जाण्यापूर्वी परिचारिका किंवा आहारतज्ञ रुग्णाला याबाबतीत सल्ला देतात. रुग्णाने शस्त्रक्रियेनंतर समतोल आहार घेणे आवश्यक व महत्त्वाचे असते. त्यामुळे खायला कठीण जात असेल तर रुग्णाने पूरक पोषक द्रवपदार्थ आहारात घ्यावेत.

रुग्णालयातून घरी जाण्यापूर्वी रुग्णाला शस्त्रक्रियेनंतरच्या तपासणीची तारीख दिली जाते. बाह्यरुग्ण विभागात ही तपासणी होते. शस्त्रक्रियेनंतर काही अडचणी वा त्रास असल्यास रुग्णाने यावेळी त्याबाबत डॉक्टरांशी चर्चा करावी.

## कंठस्थ ग्रंथि–संप्रेरक

कंठस्थ ग्रंथी जे संप्रेरक निर्माण करतात ते शरीराची चयापचय क्रिया नियंत्रित करत असतात. कंठस्थ ग्रंथी काढल्यानंतर हे संप्रेरक निर्माण होत नाहीत. त्यामुळे रुग्णाला संपूर्ण उर्वरित आयुष्यभर हे संप्रेरक तोंडाने म्हणजे गोळ्यांच्या वगैरे स्वरूपात घ्यावे लागतात. जर असे केले नाही तर कंठस्थ ग्रंथिअल्पक्रियतेची लक्षणे रुग्णामध्ये निर्माण होतात.

रुग्णाच्या शरीरातील थायरोक्सिनची पातळी प्रसामान्य मर्यादित आहे की नाही हे पाहण्यासाठी नियमित रक्त तपासणी करणे आवश्यक असते. कृत्रिम संप्रेरकांशी जुळवून घेण्यास शरीराला वेळ लागतो. त्यामुळे सुरुवातीला औषधाच्या मात्रेमध्ये सतत बदल करण्यात

येतो. सुरुवातीला संप्रेरकांची पातळी चटकन वाढवण्यासाठी लिओथायरोनाइन नावाचे औषध दिले जाते. नंतर थायरोक्सिनच्या गोळ्या दिल्या जातात.

कंठस्थ ग्रंथी नैसर्गिकरीत्या जे संप्रेरक निर्माण करतात ते निर्माण होत नसल्यामुळे त्याऐवजी या गोळ्या असतात. त्यामुळे या गोळ्यांचे कोणतेही सहपरिणाम होत नाहीत.

कंठस्थ ग्रंथि संप्रेरक गोळ्या दररोज आठवणीने नियमितपणे घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. गोळ्या घेण्याची वेळ ठरवून घ्यावी आणि या वेळांमध्ये बदल करू नये.

## किरणोपचार (रेडिओथेरपी)

किरणोपचार पद्धतीत कर्करोगावर इलाज करण्यासाठी शक्तिमान किरणांचा उपयोग केला जातो. त्यामुळे कर्करोगाच्या पेशी नष्ट होतात. मात्र निरोगी पेशींना कमीत कमी इजा होते. शक्तिमान क्ष–किरण यंत्राने बाहेरून उपचार केला जातो. कधी कधी किरणोत्सारी सळईने (Radioactive) किंवा अन्य प्रकारे आतल्या आत उपचार केला जातो. कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगावर करण्यात येणाऱ्या किरणोपचाराविषयी काही महत्त्वाचे मुद्दे पुढे दिले आहेत.

जर तुम्ही पॅपीलरी अथवा फॉलोक्यूलर थायरॉईड कर्करोगाने ग्रस्त असाल तर तुमची संपूर्ण कंठस्थ ग्रंथीच शल्यक्रियेने काढून टाकण्यात येईल व नंतर तुमच्या मानेवर व शरीराव रेडीओॲक्टीव आयोडीनचा वापर करून छायांकन होईल. काही कर्कपेशी शिल्लक तर राहिल्या नाहीत याची खात्री करून घेण्याकरता संपूर्ण शरीराचे रेडियो–आयसोटोप स्कॅनीय पण केले जाईल. जर काही पेशी आहेत हे आढळून आल्यास रेडियोॲक्टीव आयोडीनचे अधिक शक्तिमान उपचार देऊन ह्या पेशी नष्ट केल्या जातील. जर कर्कपेशी लसिका नोड्स मध्ये असतील तर एकदा पुन्हा शल्यक्रिया केली जाण्याचा संभव असतो. जर शरीरात कंठस्थ ग्रंथीचा काही भाग शिल्लक ठेवला असल्यास संपूर्ण शरीराचे रेडियोॲक्टीव आयसोटोप स्कॅन केले जात नाही, कारण ही रोगमुक्त ग्रंथीचा सर्व रेडियोॲक्टीव आयोडिनचे शोषण करून घेईल.

## अंतर्गत किरणोपचार

### किरणोत्सारी आयोडिन

संपूर्ण कंठस्थग्रंथिउच्छेदनानंतर मानेमध्ये एकही कर्करोगपेशी शिल्लक राहू नये म्हणून किंवा कर्करोग शरीरात अन्यत्र पसरला असेल तर त्यावर उपचार म्हणून डॉक्टर किरणोत्सारी आयोडिनचा उपचार करतात. शरीराच्या इतर भागात पसरलेल्या काही कंठस्थग्रंथि–कर्करोगपेशी मानेतील प्रसामान्य कंठस्थग्रंथि–पेशींप्रमाणेच आयोडिन शोषून घेतात. त्यामुळे या पद्धतीने कर्करोगावर, तो पसरलेला असला तरीही, परिणामकारक उपचार करता येतात.

कंठस्थग्रंथीचे छाननी चित्रण करण्यासाठी जो किरणोत्सारी पदार्थ वापरला जातो तोच या उपचारामध्ये वापरला जातो; फक्त त्याची मात्रा अधिक असते. अति शक्तिमान किरणांचा बाहेरून मारा करण्याऐवजी शरीरांतर्गत किरणोपचार करण्याची ही पद्धत आहे.

किरणोत्सारी आयोडिन गोळ्यांच्या स्वरूपात देतात किंवा पिण्यास देतात किंवा दंडातील शिरेत टोचून देतात. कंठस्थग्रंथि–संप्रेरकाच्या गोळ्या चालू असल्यास उपचारापूर्वी साधारणपणे २–४ आठवडे त्या बंद करण्यात येतात.

काही कंठस्थग्रंथि–कर्करोगपेशी आयोडिन चटकन शोषून घेतात. शरीरातील अन्य ऊती असे करीत नाहीत. त्यामुळे कर्करोगपेशींना थेट मोठ्या प्रमाणात किरणांची मात्रा मिळून त्या नष्ट होण्यास मदत होते.

## सहपरिणाम

बाह्य किरणोपचारात रुग्ण किरणोत्सारी होत नाही. परंतु दुर्दैवाने अंतर्गत किरणोपचारात रुग्ण ४–५ दिवस थोडा किरणोत्सारी होतो. किरणोत्सारी रुग्णाची लघवी, रक्त, लाळ आणि घाम यांतून बाहेर पडतो. यासाठी रुग्णाची काही दिवस म्हणजे तो किरणोत्सारमुक्त होईपर्यंत रुग्णालयामध्येच देखभाल होणे आवश्यक असते.

## उपचारादरम्यान केल्या जाणाऱ्या सुरक्षिततेच्या उपाययोजना

रुग्णालयातील कर्मचारी, रुग्णाचे नातेवाईक व मित्र यांना रुग्णाच्या किरणोत्साराचा उपसर्ग पोहोचू नये म्हणून रुग्णाच्या शरीरात किरणोत्सारी आयोडिन विद्यमान असेपर्यंत काही सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्या जातात.

उपचार सुरू करण्यापूर्वी रुग्णालयातील कर्मचारी रुग्णाला हे निर्बंध समजावून सांगतात. प्रत्येक रुग्णालयाची पद्धत वेगळी असते. म्हणून रुग्णाने आधीच नीट चौकशी करावी. तसेच या उपचारामुळे आपल्यावर काय परिणाम होऊ शकतील याबाबतही रुग्णाने रुग्णालयातील परिचारिका व अन्य वैद्यकीय कर्मचारीवर्ग यांच्याशी अगोदरच चर्चा करून समजून घ्यावे.

रुग्णालयाच्या कार्यपद्धतीनुसार औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी सामान्यतः उपचार सुरू करण्याच्या एक दिवस आधी रुग्णाला रुग्णालयात दाखल व्हावे लागते. यावेळी रुग्णाला आपल्या प्रश्नाचे, शंकांचे निरसन करून घेता येते. महत्त्वाची कोणतीही गोष्ट विसरू नये म्हणून उपचारापूर्वीच रुग्णाने त्यांची यादी करून ठेवावी.

## प्रजननशक्ति व शिशुचे स्तनपान

डॉक्टर सूचित करतात की ह्या उपचार काळात स्त्रियांनी किंवा पुरूषांनी आई किंवा बाप होण्याचा प्रयत्न करू नये. कारण किरणोपचारांत वापरल्या जाणाऱ्या शक्तिशाली उर्जा

किरणांमुळे गर्भातील शिशुवर किंवा गर्भधारणेच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम होऊ शकतो. महिला जर गर्भवती असेल तर तिच्यावर रेडियोॲक्टीव आयोडिन उपचार केले जात नाहीत. जर तुम्ही गर्भवती असाल अथवा तुम्ही गर्भवती असण्याची तुम्हास शंका असेल तर डॉक्टरांना सांगावे.

तुमच्या गर्भधारणेवर रेडियोॲक्टीव आयोडिन उपचारांचा त्रास होणर नाही, जरी धोका कमी असतो तरी उपचार वारंवार करावे लागतात. तुमचे डॉक्टर किंवा नर्स याबाबत तुम्हास मदत करू शकतील.

जर तुम्ही तुमच्या शिशुला स्तनपान करीत असाल तर दुग्धपान एक–दोन दिवस बंद करावे लागेल रेडियोॲक्टीव आयोडिन उपचारानंतर. जरी या उपचारानंतर स्तनपान करणे सुरक्षित नसते तरीही पुढच्या गर्भधारणेच्या वेळी ही संपूर्ण सुरक्षितता असते.

## सुरक्षिततेच्या उपाययोजना

- **मुख्य रुग्ण विभागापासून दूर असलेल्या एका वेगळ्या खोलीमध्ये रुग्णाला ठेवण्यात येते.**
- **रुग्णाची एकट्याची शुश्रूषा करण्यात येते किंवा त्याच्यासारखे उपचार घेणारा दुसरा रुग्ण त्याच्याबरोबर असतो.**
- **रुग्ण स्त्री मुलाला अंगावर पाजत असेल तर उपचाराच्या कालावधीमध्ये तसेच त्यानंतर काही काळ तिने मुलाला अंगावर पाजू नये.**
- **बाहेर टाकलेला किरणोत्सार शोषून घेण्यासाठी रुग्णाच्या पलंगाच्या एका बाजूला लेड स्क्रीन (Lead Screen) म्हणजेच शिशाच्या पडद्यांचे आडोसे लावण्यात येतात.**
- **रुग्ण विभागाचे डॉक्टर आणि अन्य कर्मचारी एकेका वेळेला थोड्या थोड्या अवधीसाठीच रुग्णाजल थांबतात.**
- **रुग्णाला भेटायला येणाऱ्या व्यक्ती आणि रुग्णालयाचे कर्मचारी यांना किरणांचा उपसर्ग पोहोचू नये म्हणून रुग्णाच्या पलंगापासून दूर उभे राहण्यास सांगितले जाते.**
- **रुग्णाच्या खोलीतील किरणोत्सार पातळी संनियंत्रित करण्यासाठी गायगर काऊंटर नावाचे एक उपकरण वापरण्यात येते. अशा प्रकारचे छोटे उपकरण परिचारिकेला आपल्या अंगावर लावता येते.**
- **भेटायला येणाऱ्या लोकांच्या संख्येवर मर्यादा असते. त्यांना जर परवानगी दिलीच तर अगदी थोडावेळ रुग्णाच्या खोलीत थांबता येते किंवा रुग्णाच्या पलंगाच्या टोकाशी बसता येते. खोलीच्या बाहेरून इंटरकॉमवरून त्यांना रुग्णाशी बोलता येते.**
- **मुले आणि गर्भवती स्त्रिया यांना रुग्णाला भेटण्याची परवानगी नसते.**

रुग्ण उपचारांमुळे आधीच भयभीत झालेला असतो आणि वरील उपाययोजनांमुळे त्याला अगदी एकटे एकटे वाटण्याची शक्यता असते. भीतीला सामोरे जाण्याची प्रत्येकाची पद्धत निराळी असते. एकादा रुग्ण आपल्या उपचाराविषयी इत्यंभूत माहिती जाणून घेतो तर एखाद्याला शक्यतोवर कमीतकमी माहिती जाणून घेण्याची इच्छा असते. रुग्णाला एखाद्या गोष्टीबाबत सखोल माहिती हवी असल्यास रुग्णालयाचे कर्मचारी ती माहिती त्याला देतात. कर्मचाऱ्यांशी किंवा आपल्या मित्रांशी, नातेवाईकांशी मोकळे बोलल्याने रुग्णाची भीती, काळजी दूर होते. रुग्णाला एकट्याला वेगळ्या खोलीत अल्पकाळ राहावे लागते; कधीकधी एखाददोन दिवस राहावे लागते. म्हणून त्याने बरोबर पुस्तक, मासिक वगैरे घेऊन जावे, टीव्ही पाहावा किंवा रेडिओ ऐकावा म्हणजे त्याला एकटेपणा जाणवणार नाही.

किरणोत्सारी आयोडिनचा उपचार घेतल्यानंतर अगदी क्वचित रुग्णाला वेदना, थकवा आणि किंवा श्वसनाचा त्रास जाणवतो. हे अगदी विरळा दिसून येणारे सहपरिणाम आहेत. तथापि, रुग्णाला ते जाणवले तर त्याने ताबडतोब ते डॉक्टरांना सांगावे म्हणजे डॉक्टर ते कमी करण्यासाठी त्यावर औषध देऊ शकतात.

## बाह्य किरणोपचार

कंठस्थ ग्रंथीच्या कर्करोगावर उपचार करण्यासाठी क्वचितच ही पद्धत वापरतात. शस्त्रक्रियेनंतर मानेमधील उरल्यासुरल्या कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यासाठी ह्या पद्धतीचा उपयोग केला जातो.

ही उपचारपद्धती सोमवार ते शुक्रवार या दिवशी पाच हप्त्यांत रुग्णालयाच्या किरणोपचार विभागात अंमलात आणली जाते व आठवड्याच्या शेवटी विश्रांती असते. उपचारांची मुदत कर्करोगाचा प्रकार आणि आकार यांवर अवलंबून असते. डॉक्टर रुग्णाशी या उपचारांविषयी चर्चा करतात.

## रुग्णावरील उपचारांचे आयोजन

किरणोपचार पद्धतीचा रुग्णाला जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी विचारपूर्वक योजना आखणे आवश्यक असते. सुरुवातीला काही दिवस किरणोपचार विभागामध्ये रुग्णाला एका मोठया 'आभासकारी' यंत्राच्या (सिम्युलेटर) खाली झोपायला सांगून उपचार केल्या जाणाऱ्या भागाची क्ष–किरण चित्रे घेतली जातात. कधी कधी सी.टी. स्कॅनरचा देखील यासाठी उपयोग करता येतो. योजनाबद्ध उपचार हा किरणोपचार पद्धतीत महत्त्वाचा आहे. त्यामुळे रुग्णाला त्याच्यावर उपचार करणाऱ्या क्ष–किरण विशेषज्ञ डॉक्टरकडे गुण येईपर्यंत फेऱ्या माराव्या लागतात.

रुग्णावर उपचार करणाऱ्या क्ष–किरण उपचारकाला रुग्णाला योग्य बैठक देता यावी आणि कोणत्या भागांवर क्ष–किरणांचा मारा करावयाचा हे त्याच्या लक्षात यावे म्हणून रुग्णाच्या

